# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ११/०६/२०२४ (मंगळवार) सायंकाळ**

---

## दुचाकी चोर उमरेड पोलीसांच्या ताब्यात चोरीची एक मोसा जप्त

फीर्यादी नामे मयुर दत्तु श्रीरामे वय २७ वर्ष, रा. नवेगाव साधु यांनी त्याची होन्डा लीवो कंपनीची मो.सा. क्र. एम. एच. ४०/सी.एस.–७१७० ही दिनांक ०४/०६/२०२४ रोजी चे रात्री दरम्यान दत्त कृपा लॉन उमरेड येथे उभी करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने ती चोरून नेली अश्या रीपोर्ट वरून पो.स्टे. उमरेड येथे अप. क्र. २५२/२०२४ कलम ३७९ भा.द.वी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्ह्याचा उमरेड पोलीस तपास करीत असताना गुन्ह्यात चोरी गेलेली मो. सा. ही दिघोरी नागपुर येथे एक ईसमाकडे असल्याची गुप्त माहीती पोलीसांना मिळाल्याने दिघोरी चौक नागपुर येथे जाउन सदर ईसमास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने त्याचे नाव सम्राट विलास गोस्वामी वय ३९ वर्ष, रा. रीधोरा पोष्ट सातगाव, तह. हींगणा जि. नागपुर असे असल्याचे सांगीतले असुन त्याच्या ताब्यातुन नमुद गुन्ह्यात चोरी केलेली मोटार सायकल होन्डा लीवो कंपनीची मो.सा. क्र. एम. एच. ४० सी.एस.–७१७० हस्तगत करण्यात आली.

सदरची कामगीरी मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. राजा पवार उमरेड विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली उमरेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. प्रमोद घोंगे, पोलीस अंमलदार प्रदिप चवरे, राधेश्याम कांबळे, पंकज बट्टे, गोवर्धन शहारे, सायबल सेलचे सतीश राठोड यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर